विद्यापीठ ग्रंथालय
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली–४१५७१२, जि. रत्नागिरी

जा.क्र.डॉबासाकोकृवि/वि.ग्र./जाहिरात/२३० /२०२४ दिनांक : ३०/०९/२०२४

# जाहिरात

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत विद्यापीठ ग्रंथालयामध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे दिलेल्या तपशिलानुसार पद भरण्यासाठी सोबत जोडण्यात आलेल्या नमुन्यामध्ये शैक्षणिक प्रमाणपत्राच्या सत्यप्रतींसह पात्र उमेदवारांकडून **दिनांक १४/१०/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यत अर्ज मागविण्यात येत आहेत.**

| अ. क्र. | पदाचे नाव | पदांची संख्या | एकत्रित वेतन | नेमणूकीचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | कार्यालय सहाय्यक | १ | १५,०००/– | ११ महिने |

**आवश्यक शैक्षणिक अर्हता**

| अ. क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | कार्यालय सहाय्यक | १) पदवीधर (कला, वाणिज्य, विज्ञान)<br>२) मराठी टायपिंग ३० श. प्र. मि. आणि इंग्रजी टायपिंग ४० श. प्र. मि.<br>३) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ,मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र<br>४) संगणकाबाबत विशेष ज्ञान (Software & Hardware) |

**नियम व अटी :–**

१. वयोमर्यादा :– खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता अर्जदाराचे वय ३८ वर्ष व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांकरीता ४३ वर्ष राहील.

२. उमेदवारांनी विहित प्रपत्रामध्ये पूर्ण तपशिल भरुन अर्ज सादर करावा. **अर्ज मा. प्रभारी अधिकारी, विद्यापीठ ग्रंथालय,डॉ.बा.सा.कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचे नावे व त्यांचे कार्यालयात टपालाने, हातबटवडा अथवा कुरीअर मार्गे दिनांक१४/१०/२०२४ पुर्वी सायंकाळी ५ वाजेपर्यत** पोहोचतील अशाप्रकारे पाठविण्यात यावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

३. अर्जाच्या लखोटयावर "कार्यालय सहाय्यक" या पदासाठी अर्ज असा उल्लेख करावा.

४. उमेदवारांच्या प्राप्त अर्जाची छाननी करण्यात येईल व पात्र अर्जधारकांची यादी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर http://dbskkv.org/ प्रसिध्द करण्यात येईल.

५. पात्र उमेदवारांची निवड समितीद्वारे नमुद तारखेला मुलाखती घेण्यात येतील.

६. मुलाखतीला येताना अर्जाला जोडण्यात आलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती सोबत आणाव्या लागतील.

७. मुलाखतीसाठी बोलावण्यात आलेल्या उमेदवारांना प्रवास तसेच दैनिक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

८. निवड झालेल्या उमेदवाराला नेमणूकीच्या आदेशातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा विहित नमुन्यात रुपये १००/– रक्कमेच्या बॉन्ड पेपरवर लिहून द्यावा लागेल.

९. निवड झालेल्या उमेदवाराला अकरा महिने किंवा प्रकल्पाच्या कालावधीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल.

१०.उमेदवाराला प्रकल्प/योजनेतील नेमणूक पुढे चालू ठेवण्यासाठी तसेच डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोलीच्या नियीमत आस्थापनेवार नियुक्तीसाठी दावा करता येणार नाही.

११.उमेदवाराला नोकरी सोडून जाण्याची इच्छा असल्यास एक महिन्याची आगाऊ मंजूरी घ्यावी लागेल अन्यथा एक महिन्याचे वेतन भरणा करावे लागेल.

Mahabharti.in

१२.उमेदवाराचा अर्ज नाकारण्याचा अधिकार विद्यापीठाकडे आहे.

१३.निवडलेल्या उमेदवारांना विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये जेथे योजना कार्यरत आहे तेथे नियुक्ती देण्यात येईल.

१४.कार्यालयाच्या कामकाजाची वेळ ०९.०० ते १७.३० अशी राहील तथापी,एखादया दिवसाचे काम वाढल्यास काम पुर्ण होईपर्यत थांबावे लागेल याची नोंद घ्यावी.

१५.सुट्टीच्या दिवशी कामाच्या निकडीनुसार उपस्थित रहावे लागेल.

१६.जादा केलेल्या कामाचा कोणताही मेहनताना देण्यात येणार नाही.

१७.तात्पुरत्या नेमणुकीच्या कालावधीत सर्व शासकीय सुट्टया आणि दोन महिन्यांसाठी एक यानुसार किरकोळ रजा देय राहतील. या व्यतिरीक्त रजा हया बिनपगारी करण्यात येतील.

१८.काम समाधानकारक न वाटल्यास उमेदवारांच्या सेवा कोणत्याही दिवशी समाप्त करण्याचा अधिकार सबंधीतांना राहील.

१९.सदर तात्पुरती नियुक्ती अकरा महिने कालावधीकरीता राहील. नियुक्तीसाठी प्राधिकारी यांना विशेष परिस्थीतीत कोणत्याही वेळी अशा तात्पुरत्या नियुक्त्या समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

२०.सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्रमांक एसएलपी–५४५३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या नियुक्तीवरील उमेदवारास विद्यापीठ सेवेत कायम नोकरी मिळण्याबाबत हक्क राहणार नाही.

२१.कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन केल्यास उमेदवाराची नेमणूक रद्द होऊ शकते.

२२.कोणत्याही टपाल विलंबास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

२३.लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नमुना–अ मध्ये अर्जासोबत सादर करावे

२४.नावामध्ये बदल असल्यास गॅझेट (राजपत्र) जोडण्यात यावे.

२५.जन्मतारखेचा पुरावा जोडावा.

२६.प्रमाणपत्रे सत्यप्रतीत/स्वयंसाक्षांकीत असल्यास स्वयंघोषणापत्रासह जोडणे आवश्यक आहे.

२७.अर्जावर उमेदवाराचा पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवावा.

प्रभारी अधिकारी
विद्यापीठ ग्रंथालय
डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

प्रत माहितीसाठी व प्रसिध्दीसाठी

प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी.

२/– त्यांना कळविण्यात येते की, सदर जाहिरात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

Mahabharti.in